# नव्या युगासाठी प्रबोधन

भाग २

डॉ. प्रा. जे. बी. शिंदे

रिया पब्लिकेशन्स्

**नव्या युगासाठी प्रबोधन – भाग २ : डॉ. प्रा. जे. बी. शिंदे**

© **डॉ.प्रा.जे.बी.शिंदे.**

'विजया निवास' साळोखे नगर,
कळंबा रोड, साई मंदिर मागे, कोल्हापूर.
मोबा. : ९२२५८०९०७१

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब–३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ३६०/–

माझ्या नव्या पिढीतील,
चि. अक्षय भगतसिंग जितकर
चि. मधुरिमा भगतसिंग जितकर
चि. गौरी प्रमोद शिंदे
या नातवंडांना अपेक्षापूर्वक प्रेमळ भेट.

# प्रबोधनाची भूमिका

प्रबोध हा शब्द बोध शब्दानंतर येतो. आधी बोध मग प्रबोध. त्यातून बोध हा फक्त बुद्धिमंतांनाच होतो. बुद्धी हे मूळ भांडवल आहे, ते नसेल तर पुढे काहीच नाही. बुद्धिवाद हा प्रबोधानंतरचा टप्पा आहे. बुद्धिवाद, बुद्धिप्रामाण्यवाद हे रसायन काही वेगळेच आहे. जगातील सगळी दहावी, बारावी, पदवीधर, पदव्युत्तर लोकच असतात पण ते बुद्धिवादी, बुद्धिप्रामाण्यवादी असतात काय? त्यापैकी दहा टक्के लोक सुद्धा बुद्धिप्रामाण्यवादी नसतात. याचा अर्थच असा की सारे अशिक्षित आणि शिक्षितांपैकी बहुसंख्य लोक हे परंपरानिष्ठच असतात म्हणूनच निदान शिक्षितांच्या बुद्धीला तरी पॉलिश करण्याचे काम प्रबोधनाचे रसायन वापरून करण्याचा उपक्रम शहाण्या माणसांनी, प्रबोधनकर्त्यांनी सतत केला पाहिजे.

कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यातून बोध होतो पण ते काम फक्त जीवनवादी साहित्यिकच करू शकतो. कलावादी साहित्यकारांचे ते काम नव्हे. जीवनवादी लेखक मनात बोध धरूनच लेखन करतो आणि तो बोध कथेद्वारे तो समाजाला देण्याचा रम्य प्रयत्न करतो पण पुष्कळ वेळा कथेत जर मन अडकले तर रसिकाला बोधाचे स्मरण राहात नाही. त्यामुळे कथात्मक बोधापेक्षा शुद्ध बोध बरा, प्रबोधन बरे हेच खरे.

मराठीतील प्रबोधनाचा पहिला प्रयत्न लोकहितवादी यांनी केला आणि त्यांच्या पाठोपाठ महात्मा फुले यांनी केला. शतपत्रांद्वारे लोकहितवादींनी आणि गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड आणि इतर साहित्याद्वारे जोतिरावांनी केलेले प्रबोधकार्य हे युगपरिवर्तनकारी होते. लोकहितवादी आणि महात्मा फुले यांच्या लेखनातून भारताच्या मागासलेपणाचं मूळ लोकांच्या 'अविद्येत', 'अडाणीपणात' असल्याचे दिसून येते आणि अज्ञानाचं कारण ब्राह्मणांनी त्रैवर्णिकांना केलेल्या शिक्षणबंदीमध्ये दिसून येते. दोघाही समाजचिंतकांनी ब्राह्मण वर्गालाच त्यासाठी जबाबदार धरले असून तोच विचार मूलभूत आहे.

सन १८५० ते २०१० अशा दीडशे वर्षांत शिक्षणप्रसार होऊनही लोक अप्रबुद्ध आहेत याचे कारण काय? कारण ब्राह्मण वर्गाने देवधर्मासंबंधी, आत्म्यासंबंधी, धार्मिक कर्मकांडासंबंधी, भारतीय तत्त्वज्ञानासंबंधी जे भ्रम, अफवा, दंतकथा, पुराणकथा, पूर्वी रचल्या, पसरविल्या त्याच तो वर्ग (ब्राह्मण वर्ग) आजही छातीठोकपणे, हट्टाने, शेंडीला गाठ बांधून पसरवितो आहे आणि मार्क्सने या धार्मिकतेला अफूची गोळी म्हटले. ती गोळी समाजाच्या तोंडात नियमितपणे कोंबण्याची खबरदारीही तो घेत आहे. रुचिपालट म्हणून तो या गोळीचे बाह्यरूप बदलतो पण त्यातील जी धार्मिक अफू आहे ती तो पूर्वीइतक्याच प्रमाणात ठेवतो.

पूर्वी राजांच्या बाबतीत दुष्ट प्रधान असे काम करीत. राजाला मदिरा आणि मदिराक्षी अर्थात बाटली आणि बाई यांच्या नादी लावायचे आणि आपला स्वार्थ साधत राहायचे. मनमानी कारभार करायचे, राजा मदिरा-मदिराक्षीमध्ये मरेपर्यंत राहिला पाहिजे हे कटाक्षाने दुष्ट प्रधान पाहात असे आणि तो मेला की गादीवर जो त्याचा वारस येईल त्याच्या मागे प्रधानाचे जादूचे खेळ लागायचे. अक्षरश: तसा प्रकार ब्राह्मण वर्ग समाजाबाबत करीत आला आहे, करीत आहे आणि करीत राहणार आहे. त्यामुळेच भारताचे जीर्णशीर्ण स्वरूप धर्म-कर्म, ईश्वर, आत्मा, राशीभविष्य, अंधश्रद्धा यांच्या दुर्गंधीने, कुजलेल्या रूपाने समाजात अस्तित्वात राहणार आहे आणि त्यात बदल होणे शक्य नाही. त्यामुळे प्रबोधनाचे कार्य कधीही संपणार नाही.

म्हणूनच माझे प्रबोधनाचे लेखन सतत समाजापुढे ठेवणे गरजेचे आहे. विषबाधा झालेल्या रोग्यावर केव्हापर्यंत इलाज आवश्यक आहे? असा हा प्रश्न आहे. विषबाधा पूर्णत: नाहीशी होईपर्यंत औषधोपचारात खंड पडून उपयोग नाही. प्रबोधनाचे डोस जो रोगी भेटेल त्याला सतत दिले गेले पाहिजेत. हे काम राष्ट्रीय मोहीम आखून केले गेले पाहिजे. पण झाले आहे काय की एका बाजूला भारत देशाने अशक्त शरीर आणि दुसऱ्या बाजूला ब्राह्मणी संस्कृतीच्या अत्यंत घातक, अत्यंत क्रियाशील विषारी जंतूंनी केलेला हल्ला असे हे निराशाजनक चित्र आहे.

आजवर ब्राह्मणी संस्कृतीवर उघडपणे कुणी बोलत, लिहित नसत. पाण्यात राहून माशाशी वैर कशाला करा अशा सूज्ञ आणि धूर्तपणाचे वर्तन लोक (ब्राह्मणेतर माणसे) करीत पण आजची परिस्थिती वेगळी आहे. बदलली आहे. पूर्वी समाजाच्या सर्व नाड्या ब्राह्मण समाजाच्या हातातच होत्या. अगदी तलाठी (कुलकर्णी) पासून जज्जापर्यंत सर्व नोकरवर्ग ब्राह्मणच होता आणि तो पदोपदी भेटायचा. त्यांना चुकवूनही चालत नसे पण छ. शाहूंच्या कर्तबगारीमुळे, धोरणीपणामुळे नोकरभरतीत ब्राह्मणेतरांचा प्रवेश झाला आणि हळूहळू तो वाढतच गेला. आज तलाठ्यापासून मामलेदार, फौजदारापर्यंत आणि वकील-न्यायाधीशापर्यंत शासकीय सेवेत ब्राह्मण फारसे नाहीत. आज ते बँकिंग आणि माध्यमक्षेत्रात (वृत्तपत्रे, दूरदर्शन, नाटके, लेखन-प्रकाशन) घुसलेले असून आज माध्यमक्षेत्राद्वारे समाजाला धर्मकर्माच्या वाटेने नेण्याचे काम नेकीने बजावत आहे. परवाची घटना -

झी मराठीवर एका गायिकेने 'दैवजात दु:खे भरता दोष ना कुणाचा, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' हे गाणे म्हटले. नंतर दोन ब्राह्मण परीक्षकांनी निकाल सांगून मार्क्स देताना म्हटले, 'माडगूळकर आण्णांनी जीवनाचं किती यथार्थ वर्णन केलं आहे. आम्ही सगळी माणसं पराधीनच आहोत. (वर हात करून) तो जसे नाचवील तसं नाचणं एवढंच आपल्या हाती आहे. आता हेच पाहा की तुला गाताना एक शब्द आठवला नाही तेव्हा तुझी केवढी पंचाईत झाली. म्हणजे आण्णा म्हणतात ते खरंच आहे ना? एवढी तयारी करून असा हतबल करणारा प्रकार घडावा याचा अर्थ आपण देव, दैव, नशीब, नियती, परिस्थिती, आपले मन, शरीर यांच्या आणि पर्यायाने त्या जगचालक शक्तीच्या हातातील बाहुलेच आहोत ना?' त्यानंतर दुसऱ्या परीक्षकानेही नियतीवाद, पराधीनतावादाचं षंढ पुराण पुन्हा कथन करून आण्णांचं म्हणणं कसं योग्य आणि त्रिकालाबाधित सत्य आहे तेच सांगितलं. माझी तक्रार या संदर्भात जशी आण्णांच्या गीतरचनेबद्दल आहे तशीच ती या दोन परीक्षकांबद्दलही आहे. एक समर्थ माध्यम माणसाची असमर्थता आणि ईश्वर नावाच्या खोट्या,

काल्पनिक विषयाकडे कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् शक्ती सोपविण्यासाठी वापरले जावे हे केवढे घातक वळण आहे? लाखो ऐकणाऱ्यांच्या मनात अंधश्रद्धा पुष्ट करण्याचे काम ही माध्यमे (त्यात राशीभविष्य छापणारी वृत्तपत्रेही येतात) एवढ्या इमानेइतबारे करीत असतील तर प्रबोधन कसले बोडक्याचे होणार? तात्पर्य – ब्राह्मणी संस्कृतीच्या अंधश्रद्धा जोपासनेच्या कार्यात दिवसेंदिवस प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढच होत चालली आहे असं म्हणू किंवा जाणूनबुजून वाढ केली जात आहे असं म्हणू. पण हे सारं अनिष्ट आहे.

असा हा प्रतिगामी विचारांचा ब्राह्मणी संस्कृतीचा महासागर उसळत असताना आणि तो प्रबोधनाच्या पुरोगामीपणाला गिळू पाहात असतानाही प्रबोधनकर्त्यांनी निराश होऊन चालणार नाही. बुद्धीच्या होडीत बसून आपण महासागरावर विजयी होऊ शकतो. मी माझ्याकडून बुद्धीच्या होड्यांचा कारखानाच प्रबोधनाच्या लेखनाद्वारे सुरू केला आहे. ज्यांना हव्यात त्यांना मी या होड्या मोफत देतो. पण ज्या माणसांनी ह्या महासागरात जलसमाधी घेतल्यास स्वर्ग मिळतो अशी समजूत करून घेतली आहे ते या होड्या न वापरता बुडून मरण्याचा आनंद उपभोगत असतात. मी त्यांची काळजी करूच शकत नाही.

पण जे संदेहशील आहेत, ज्यांना ईश्वर आहे की नाही अशी शंका येते, नसावा असा संशय ज्यांना येतो त्या संदेहशील लोकांसाठी माझे प्रबोधन चांगले आहे. त्यांच्या शंकांचं निरसन माझ्या प्रबोधनाद्वारे झालं की ते बुद्धिवादी होतील आणि त्यांना आपले आयुष्य अधिक चांगल्या प्रकारे जगता येईल असा विश्वास मला वाटत असल्यामुळेच मी आजन्म प्रबोधनकर्त्याच्या भूमिकेत राहायचं ठरविलं आहे. मी स्वीकारलेली मते अशी.

प्रथमत: चार्वाकांचे तत्त्वज्ञान सर्वस्वी सत्याधिष्ठित आहे म्हणून सर्वांनी चार्वाक काय म्हणतात ते नीट समजून घ्यावे. तो ईश्वर, आत्मा, त्रैलोक्य, अमरत्व, पुनर्जन्म, कर्मफल यातील काहीही मानत नाही. बुद्धही ते सारं खोटं म्हणतात, महावीरही ईश्वरवादी नव्हते. सांख्यदर्शनकार कपिलही निरीश्वरवादीच होते. शंकराचार्य (आद्य) म्हणाले, 'जो बुद्धीने ईश्वरी कल्पनेच्या पलीकडे गेला त्याने ईश्वर मानण्याची काही गरज नाही. (संदर्भ आधुनिक भारत लेखक आचार्य जावडेकर) बुद्धिवादाची परंपरा अशी भक्कम असताना मी बुद्धिवादाचा स्वीकार केला असेल तर ते योग्यच आहे. म्हणूनच मी माझ्या नव्या युगाचे अभंग खंड एक, दोन, तीन मधून जे लिहिले त्याचाच गद्य अवतार म्हणजे प्रबोधन होते. अभंग मी अत्यंत सोप्या भाषेत लिहिले आणि प्रबोधनाचे लेखन करतानाही लोकभ्रम दूर करण्याचा प्रयत्न मी केला. वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केला. तर्काचा यथास्थित वापर केला आणि 'ईश्वर नाही' हे सत्य निर्भयपणे सांगितले. माझा निर्भयपणा काही लोकांमध्ये संचारला आणि ते माझे चाहते झाले हा माझा फार मोठा विजय आहे. आज महाराष्ट्रातील हजारो वाचक 'चित्रलेखा' साप्ताहिकातील प्रबोधन हे माझं सदर मोठ्या आवडीनं वाचतात आणि प्रसंगी सामुदायिक वाचन करतात हे यश कमी आहे काय? मात्र समाजात शहाणी माणसे मोजकीच असतात. ती कधी जत्रेत तुम्हाला भेटणार नाहीत. जत्रेत हौसेने, काही लाभाच्या इच्छेने किंवा अंधश्रद्धेने लोक जातात पण बुद्धिवादी मुळात जत्रेला जातच नाही. तो सत्याचा शोध घेण्यात धन्यता मानतो.

सावता माळी, 'कांदा, मुळा, भाजी हीच विठाई माझी' असं म्हणाले, 'आईबाप हे दैवत माझे असता माझ्या घरी कशाला जाऊ मी पंढरपुरी' असं मातृ–पितृभक्त पुंडलिक म्हणाले, 'जत्रा में फत्तरा बिठाया दुनिया भई दिवानी' असं संत कबीर म्हणाले. संत गाडगेबाबा पांडुरंगाच्या देवळात कधी दर्शनासाठी गेले नव्हते. 'रघुपती राघव राजाराम, पतितपावन सीताराम' म्हणणारे गांधीजी कधी व्दारका, मथुरा–वृंदावनाच्या यात्रा स्पेशलचे यात्रेकरू झाले नाहीत. कारण ही सर्व माणसे आद्य शंकाराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे ईश्वरकल्पनेच्या पलीकडे गेली होती. ज्ञानदेवांनी ईश्वराला 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे?' असा सवाल करून ईश्वरकल्पनेचा फोलपणा स्पष्ट केला तर तुकोबांनी 'देव आहे असे वदवावे जनी, नाही असे मनी समजावे' असे उद्गार काढून देव ही कल्पना त्याज्य मानली. सगळेच चिंतनशील लोक निरीश्वरवादीच असतात. आधुनिक काळातील एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, हे पु.ल. देशपांडे, प्रा.द.के.केळकर, प्रा. मा.का. देशपांडे, श्रीराम लागू, निळू फुले, ही माणसे जाहीरपणे ईश्वर नाकारतात. त्यांच्या पूर्वी गोपाळ गणेश आगरकर, रामस्वामी पेरियार, यांनीही निरीश्वरवाद स्वीकारला होता. वरील थोर माणसांत बरीच ब्राह्मण असूनही ईश्वर नाकारतात म्हणून ती आणखीनच थोर आहेत.

आता बहुजन समाज जागा होतो आहे. पण तो चिंतनाच्या आधारे जोपर्यंत निरीश्वरवादी होत नाही तोपर्यंत तो जागा झाला आहे असे मी म्हणणार नाही. ईश्वर नाकारणे हीच माणसाच्या जागेपणाची खरी कसोटी आहे. ईश्वर नाकारल्यामुळेच आपण कर्तृत्ववान होणार आहोत. जीवनात यशस्वी होणार आहोत. बहुजन समाजाने ईश्वरवाद हे ब्राह्मणी थोतांड आहे हे लक्षात घेऊन, तोच विचार केंद्रस्थानी ठेवून विचार केल्यास त्याला हद्दवादीपणाच्या स्वर्गात निश्चित प्रवेश मिळेल.

महाराष्ट्राचे आजचे प्रबोधनपर्व डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या नावाने लिहिले जाईल. अंधश्रद्धेचं प्रदूषण त्यांनी आपल्या शोध-संशोधनातून, पुस्तकाद्वारे, लेख-भाषणाद्वारे समाजापुढे सतत ठेवले असून त्यांच्या विचारस्पर्शाने आमच्यासारखे बरेच दगड-गोटे बुद्धिवादाच्या आकाशात मंदपणे का असेना प्रकाशत आहेत. सूर्याच्या प्रकाशाने ग्रहगोलच नव्हे तर उल्काही चमकतात. माझ्या प्रबोधपर लेखनाने माझा वाचक अधिक चिकित्सक, संदेहशील, विचारवंत, तर्कशील व्हावा आणि ईश्वराचा पांगुळगाडा त्याने भिरकावून देऊन स्वत:च्या पायावर 'जमेल तसे' उभे राहावा एवढीच माझी माफक इच्छा आहे. त्या माझ्या वाचकांनी जे ईश्वरवादी आहेत, सनातनी आहेत, भक्त-भाविक आहेत, पंडे-पुजारी आहेत त्यांच्याकडे द्वेषाने, तिरस्काराने पाहू नये. त्यांची निंदा करू नये, त्यांना जनावरे, मेंढरे समजू नये, ती सुद्धा माणसेच आहेत असे मानावे. महात्माजी म्हणत, 'Hate the sin, not the sinner.' रोगाचा तिटकारा करावा रोग्याचा नव्हे. प्रबोधन मानवतेच्या कल्याणासाठी आहे. ते साध्य होणे महत्त्वाचे.

**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

# अनुक्रमणिका

## ❍ *थोर व्यक्तींविषयक :*


| | | | |
|---|---|---|---|
| १. | इडा-पीडा टळो, बळीचे राज्य येवो | (बळीराजाची थोरवी) | १९ |
| २. | बळीराजा तुझे माहात्म्य अथांग | (बळीराजाचे माहात्म्य) | २३ |
| ३. | ऋषितुल व्यक्तिमत्व : शाहू महाराज | (छ. शाहूंचा थोरपणा) | २७ |
| ४. | शाहूंची बुद्धिप्रामाण्यवादी भूमिका | (छ. शाहूंचा मोठेपणा) | ३० |
| ५. | कर्मनिष्ठ शाहूराजे | (छ. शाहूंचे थोर कार्य) | ३३ |
| ६. | जगाचे श्रद्धास्थान : म. गांधी | (युगपुरुष म. गांधी) | ३६ |
| ७. | बापूंची ईश्वरसेवा | (गांधीजींचे असाधारण..) | ४० |
| ८. | ज्ञानयोगी : पं. नेहरू | (शांतिदूत पं. नेहरू) | ४३ |
| ९. | प्रखर सत्यशोधक: अण्णाभाऊ साठे | (अण्णाभाऊंची थोरवी) | ४६ |


## ❍ *सामाजिक प्रबोधन :*

*(देश, राष्ट्र, स्वातंत्र्य, लोकशाही, मतदान, स्त्रीमुक्ती दिन इत्यादी...)*


| | | | |
|---|---|---|---|
| १. | शोषणापासूनी मुक्ती, ते स्वातंत्र्य | (स्वातंत्र्यदिनाविषयी) | ५१ |
| २. | गुलामी हा मृत्यू | (स्वातंत्र्यवंदना) | ५४ |
| ३. | लोकशाही आहे, कल्पवृक्ष दारी | (प्रजासत्ताकदिन विशेष) | ५८ |
| ४. | बलशाली देश, भारत हा होवो | (गणतंत्रदिन विशेष) | ६१ |
| ५. | दुर्दैवी सौभाग्य तशी लोकशाही | (लोकशाही चिंतन) | ६४ |
| ६. | दीपोत्सव लाभो ज्याचा असे त्यास | (दीपावली चिंतन) | ६७ |